महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासा अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.५६९/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ५८८ दि.१५/०७/ २०१९

**विषय :** राज्य शासनाच्या निर्णयानुसार म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना दि. ०१ जानेवारी, २०१९ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर करणेबाबत.

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्र. मभवा-१३१९ / प्र.क्र.१३ / सेवा - ९ दि. ०८.०७.२०१९.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५८७ दि. १५/०७/२०१९.

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितमधील कर्मचाऱ्यांसाठी सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. मभवा - १३१९ / प्र.क्र.१३ / सेवा - ९ दि. ०८.०७.२०१९ अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जानेवारी, २०१९, पासून असुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतनावरील (वेतनबँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय असलेल्या महागाई भत्त्याचा दर १४८% वरून १५४% केला आहे. तसेच, सदर शासन निर्णयाद्वारे हा सुधारीत दर दि. ०१ जुलै, २०१९, पासून देय करण्यात आला असून दिनांक ०१ जानेवारी, २०१९ ते दि. ३० जून, २०१९ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत शासनामार्फत स्वतंत्रपणे आदेश पारित करण्यात येणार आहेत.

३. आता, शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं. मर्यादितमधील सर्व कर्मचाऱ्यांना देय असलेला महागाई भत्ताचा दर **१४८% ऐवजी १५४% असा दिनांक ०१ जानेवारी, २०१९,** पासून सुधारीत करण्याकरीता मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (वाणिज्य), संचालक (प्रकल्प) आणि संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करुन मंजुरी प्रदान केली आहे. या अनुषंगाने सदर सुधारित महागाई भत्त्याचा दर दिनांक ०१ जुलै, २०१९ पासून लागू करण्यात यावा.

४. उपरोक्त सुधारीत दराने द्यावयाच्या दि. ०१ जानेवारी, २०१९ ते दि. ३० जून, २०१९ या कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत शासन निर्णयानुसार स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee Portal (Mitra) / e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)